महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२३/प्र.क्र.४७१/२०२३/जाहिरात दिनांक: २६ फेब्रुवारी, २०२४

## -: शुध्दीपत्रक :-

**विषय : सहायक ग्रंथालय संचालक/जिल्हा ग्रंथालय अधिकारी, गट-ब**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक - ००८/२०२४**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्राप्त मागणीपत्रानुसार **सहायक ग्रंथालय संचालक/जिल्हा ग्रंथालय अधिकारी, गट-ब** या संवर्गातील एकूण ०७ पदांच्या भरतीकरीता दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ००८/२०२४) प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: मराग्र-२०२२/प्र.क्र.५९/साशि-५, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार खालील अर्हता ग्राह्य समजण्याबाबत कळविले आहे:-

(i) B.Lib. Sc. ही पदवी कला शाखेतील पदवीला पर्याय म्हणून ग्राह्य.
(ii) B.Lib & Isc. पदवी व्यतिरिक्त थेट M.Lib & Isc ही अर्हता असेल तर सदर अर्हता ग्राह्य.
(iii) Intergrated Master degree मध्ये Bachelor degree समाविष्ट असल्याने Intergrated M.Lib & Isc ही अर्हता ग्राह्य.

२. प्रस्तुत शुध्दीपत्रकान्वये उपरोक्त अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ००८/२०२४ ला अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक** | **दिनांक ०४ मार्च, २०२४ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक ०४ मार्च, २०२४ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक ०६ मार्च, २०२४ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ०७ मार्च, २०२४ रोजी २३.५९** |

३. मूळ जाहिरातीमधील वयोमर्यादा तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव कालावधी मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.
४. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.
५. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ००८/२०२४ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.